# गोफ्रूगलतर्फे वित्तीय उत्पादनांच्या नव्या ईझी सुटचे बाजारात आगमन




पुणे : भारताची सर्वात वेगाने विस्तारणारी क्लाउड ईआरपी कंपनी (उद्योगांसाठी संसाधनांचे नियोजन करणारी कंपनी) गोफ्रूगल (ऋत्रऋणत्र-ड) ने रिटेलइझी, सर्व्हइझी आणि मॅनेज इझी या आपल्या अनुक्रमे किरकोळ विक्री, रेस्टॉरंट आणि वितरण व्यवसायासाठीच्या नव्या उत्पादनांच्या मईझी सुटफ अर्थात सुलभ संचांच्या बाजारातील आगमनाची घोषणा केली. रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सीईओ श्री. कुमार राजगोपालन यांनी एआय आणि एमएल यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा पारंपरिक किरकोळ विक्री उद्योगक्षेत्रात पहिल्यांदाच वापर करणा-या पहिल्यावहिल्या प्रायोगिक डिजिटल स्टोअरचे अनावरण केले. संशोधन अहवालांच्या आकडेवारीनुसार भारतीय किरकोळ विक्री क्षेत्रातील १४ दशलक्षांहून अधिक किरकोळ व्यावसायिकांद्वारे ७०० बिलियन डॉलर्सची उलाढाल केली जाते. या बाजारपेठेच्या एकूण गरजेपैकी ६०-९०% वाटा एमएसएमईकडून (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) उचलला जातो. किरकोळ विक्रीव्यवसाय आज बदलांच्या उंबरठ्यावर उभा आहे, तर रेस्टॉरंट उद्योग सतत प्रगत होत जाणा-या तंत्रज्ञानाशी ब-यापैकी जुळवून घेत आहे. क्लाउड किचन्स आणि ऑनलाइन डिलिव्हरी प्लॅटफॉर्ममध्ये होत असलेल्या वाढीमुळे ग्राहक या सेवेला वेगळ्या प्रकारे प्रतिसाद देत असल्याचा प्रत्यय पारंपरिक रेस्टॉरंट्सना पदोपदी येत आहे. आज ग्राहकांना केवळ प्रत्यक्ष दुकानांकडूनच नव्हे तर ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि बाजारपेठांकडूनही त्यांच्या वैयक्तिक गरजांकडे लक्ष देणा-या सेवेची, उत्पादनांच्या उपलब्धतेची आणि प्रमाण सेवेची अपेक्षा आहे. ग्राहकांच्या वर्तनात अशी उत्क्रांती घडून येत असल्याने व उद्योगक्षेत्राचे स्वरूपही बदलत असल्याने एमएसएमईंना आता बंदिस्त वातावरणात राहून काम करता येणार नाही तर त्यांना ईआरपी उपाययोजना वापरून उद्योगाच्या विविध मार्गांशी स्वत:ला जोडून घ्यावे लागेल व त्यांच्या सहकार्याने काम करावे लागेल. सहयोगातून साकारणारे हे कोलॅबोरेटिव्ह कॉमर्स आणि प्रगत ईआरपी उपाययोजनांमुळे या एमएसएमईंना आपला बिझनेस डेटा कृतीयोग्य माहितीमध्ये परिवर्तीत करता येईल. पारंपरिक एमएसएमई परिघातील किरकोळ विक्री, रेस्टॉरंट आणि वितरण व्यवसायांना लवकरात लवकर हे बदल अंगिकारणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांना आपला व्यवसाय बंद करणे भाग पडेल.गोफ्रूगलचे सीईओ आणि संस्थापक कुमार वेम्बू म्हणाले. मफ्पारंपरिक किरकोळ विक्रीकेंद्रे, रेस्टॉरंट्स आणि वितरण व्यवसायांसाठी कोलॅबोरेटिव्ह कॉमर्सची संकल्पना वास्तवात आणणारा एक मस्मार्ट प्लॅटफॉर्मफ उभारणे हे आमच्या टीमचे एकमेव लक्ष्य आहे. गोफ्रूगलच्या उत्पादनांचा नवा सुलभ संच मएक्सिपिरियन्स सिम्पिसिटीफ अर्थात सुलभतेचा अनुभव याच मंत्रावर लक्ष केंद्रित करतो. आम्ही सुरक्षित, सर्वंकष, खुल्या आणि परवडण्याजोग्या उपाययोजना देऊ करतो. प्रमुख ग्राहकांसाठी प्रायोगिक तत्त्वावर यशस्वीरित्या राबविण्यात आलेल्या या सेवासंचांचा प्रतीवर्षी किमान १००% विस्तार करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.फ्फ डिजिटल स्टोअरचे अनावरण करताना रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सीईओ श्री. राजगोपालन म्हणाले, मफ्पारंपरिक किरकोळ बाजारपेठ आज आधुनिक व्यापारपद्धतीच्या सोबतीने आपले अस्तित्व जपत आहे. हे करताना या क्षेत्राला स्वत:चा चेहरामोहराही बदलून आधुनिक आणि चैतन्यपूर्ण बनण्याचा प्रयत्न करावा लागत आहे. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान मात्र त्यांना परवडू शकत नव्हते किंवा सहज वापरता येण्याजोगे नव्हते. गोफ्रूगल सारख्या असे तंत्रज्ञान पुरविणा-या कंपन्या आपल्या विशिष्ट वापरसुलभ उत्पादनांच्या संचाद्वारे भारतभरातील लक्षावधी छोट्या व्यापा-यांना बळकटी देण्याच्या व विस्तारण्याच्या कामी मदत करतील, असा मला विश्वास वाटतो.